# महाराष्ट्र शासन

क्र. वाहन २०२५/प्र.क्र.४१/आस्था २
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
३ रा मजला (विस्तार इमारत),
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- ११ मे, २०२६

## निविदा विषयक अटी व शर्ती

| अ.क्र. | अटी व शर्ती तपशीलवार |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात निविदा दि. २० मे, २०२६ पर्यंत टपालाद्वारे अथवा स्वहस्ते / समक्ष, उप सचिव (आस्थापना) दालन क्रमांक ३३४ (विस्तार इमारत), तिसरा मजला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ येथे सादर करावी. पाकीटावर "वाहन **MH 01 AN 3999 (Toyota Innova 2.5 Z)** च्या खरेदीसाठी निविदा " असा स्पष्ट उल्लेख असावा. विहित मुदतीत निविदा प्राप्त न झाल्यास त्या विचारात घेतल्या जाणार नाहीत. |
| २ | " आहे त्या परिस्थितीत " विक्रीकरिता उपलब्ध असलेले वाहन **MH 01 AN 3999 (Toyota Innova 2.5 Z)** हे तपासणीकरिता, मंत्रालय इमारत, पार्कींग क्रमांक ६० येथे ठेवण्यात आले आहे. |
| ३ | वाहनाची लिलावाची किंमत / राखीव किंमत (Reserve price) = हातची किंमत + वृत्तपत्रांत जाहिरात प्रसिध्दीसाठी येणारा खर्च म्हणजेच, रु. १,५८,६४० + रु. ३०,००० = रु. १,८८,६४० इतकी असणार आहे. महत्तम बोली लावणाऱ्या निविदाकारास सदर वाहन शासनामार्फत विक्री करण्यात येईल. |
| ४ | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल. |
| ५ | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळविल्यापासून, विभागाच्या रोख शाखेत सदर रकमेचा भरणा करून, एका आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविण्यात येईल. |
| ६ | विक्रीकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो विक्रीकर भरावा लागेल किंवा वाहनाचा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी विक्रीकर भरल्याबाबत विक्रीकर कार्यालयात लेखी पुरावा सादर करावा लागेल. |
| ७ | कोणतेही कारण न देता, कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार, उप सचिव (आस्थापना) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांना राहील. |

| | |
|---|---|
| ८ | सदर शासकीय वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया, यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. वाहनाचे हस्तांतरण होईपर्यंत सदर वाहनाचा मालकी हक्क शासनाकडेच राहील. हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्याचा पुरावा या विभागाकडे जमा केल्यानंतरच उपरोक्त वाहन आपणास मंत्रालयातून नेता येईल. |
| ९ | वाहनाचा तपशील :- |

| | | |
|---|---|---|
| १ | इंजिन नंबर | 2KD S565286 |
| २ | चेसीस नंबर | MBJ 11JV 40075 43028 0715 |
| ३ | खरेदीचे वर्ष | सन २०१५ |
| ४ | आतापर्यंत धाव | दि. २३.०४.२०२६ पर्यंत १,८९,६६८ कि.मी. |
| ५ | रंग | Super White |
| ६ | मॉडेल | टोयोटा इनोव्हा |




(सो.रं.आरोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

D:\Sopan R Arote\कार्यालयीन बाबी\प्रकरणे\२०२५\प्र.क्र.४१ २०२५ वाहन निर्लेखन ३९९९\निर्लेखन नोट MH ०१ AN ३९९९.rtf